कुलसचिव कार्यालय
जा. क्र. 326
दि. 18/08/2018

आरोग्यकेंद्र

दि.०९/०८/२०१८

**विषयः देहांगदान जीवनदान समाजसेवी संस्था यांचाकडून प्राप्त माहिती पत्रकाबाबत**

सादर,

उपरोक्त विषयास अनुसरून देहांगदान जीवनदान समाजसेवी संस्था यांचाकडून अवयव दान व देह दान याबद्दल सर्व सामान्य जनतेमध्ये जनजागृती व्हावी यासाठी अवयव दान व देह दान यावर आधारित माहिती पत्रक प्राप्त झालेले आहे. संस्थेचा हेतू व कार्य लक्षात घेता तसेच अवयवदानाबद्दल असलेली अनास्था व गैरसमज दूर व्हावेत यासाठी सदर संस्थेकडून प्राप्त माहिती पत्रक विद्यापीठातील सर्व अधिविभागातील सूचना फलकांवर लावण्यासाठी मान्यता असावी. तसेच सदर माहिती पत्रक सर्व महाविद्यालयांना पाठविण्यास व विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रकाशित करण्यास प्रशासकीय मान्यता असावी.

9/8/2018

वैद्यकीय अधिकारी

'अ' मान्यतेस्तव सादर

कुलसचिव 18.8.18

मा.कुलगुरू

।। देहागदान सर्वश्रेष्ठ दान।।

नोंदणी क्र. महा /६०/२०१५ दि. २०.१.१५

# देहांगदान जीवनदान समाजसेवी संस्था

२४ तास विनामुल्य सेवा

ऑफिस : ६९१ शुक्रवार पेठ, श्री आजोबा गणपती मार्ग, सोलापूर-४१३००२.

फोन ०२१७-२७२९८७०

## प्रेरणा पत्र

**नेत्रदान, अवयवदान, देहदान, त्वचादान व ग्रीन कॅरिडोर हे मिडिया व माणसांच्या चर्चेतील शब्द. सदरची संस्था हि साल २०१० पासून सातत्यांनी या गोष्टींचा प्रसार व प्रचार करीत आहे. या प्रयत्नास सोलापूर शहरात सामाजिक जीवनातून सकारात्मक प्रतिसाद दिसून येत आहे.**

**१) नेत्रदान :-** नेत्रदानासाठी पुढील काळजी येणे आवश्यक आहे. (अ) नेत्रदान हे केवळ मरणोत्तरच करता येते. (ब) डोळे बंद करुन त्यावर ओल्या कापडाची पट्टी ठेवावी (क) पंखे बंद करावेत (ड) A.C. असल्यास चालु ठेवावे. (इ) त्वरीत नेत्रपेढीशी किंवा सदरच्या संस्थेशी संपर्क करावे.

नेत्रदान हे मृत्युनंतर केवळ ४ ते ६ तासाच्या आतच करता येते. नेत्रपेढीचे पथक मृतदेह ज्या ठिकाणी आहे तेथे येवून २० ते २५ मिनिटात प्रक्रिया पुर्ण करते.

**२) देहदान :-** मृतदेहाचा उपयोग वैद्यकिय विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी व संशोधनासाठी होतो. देहदानानंतर धार्मिक विधी करता येतात. देहदानासाठी मृतदेह मृत्युनंतर ४ ते ७ तासात स्विकारला जातो. देहदानासाठी मृत व्यक्तींच्या नातेवाईकाची संमती आवश्यक आहे.

**३) त्वचादान :-** त्वचादान जीवंतपणी व मरणोत्तर ही करता येते. त्वचादानाने गंभीररित्या भाजलेल्या अनेक रुग्णांना दिलासा मिळतो. त्वचादानासाठी त्वचापेढी लवकरच सोलापूरात सुरु होत आहे.

**४) अवयवदान:-** मेंदुमृत (ब्रेनडेड) रुग्ण व्यक्तीचे अवयवदान करता येते. ब्रेनडेड या अवस्थेत शरिरातील इतर अवयव कार्यरत असतात. फक्त मेंदु निष्क्रीय झाल्यामुळे कोणत्याच उपचारास प्रतिसाद देत नाही. ब्रेनडेड झाल्यास पुढील महत्वाचे अवयवदान करता येते.
१) किडनी २) डोळे ३) यकृत ४) स्नायुपिंड ५) हृदय ६) फुफ्फुसे, केवळ एका व्यक्तीच्या अवयवदानामुळे अनेकांना जीवनदान मिळते.

**५) ग्रीन कॅरीडोर :-** अवयवदानात हा शब्द वारंवार ऐकू येतो. अवयव प्रत्यारोपणात एक – एक सेंकद वेळ अंत्यत महत्वाचा असतो. दोन्ही पेंशट वेगवेगळ्या शहरात असतील तर वेळ पाळण्यासाठी खुपच तारांबळ उडते. एका शहरातून दुसया शहरात अवयव घेवून जाण्यासाठी हवाई व रस्ते वाहतुकीचा वापर करावा लागतो. अवयव ज्या रस्त्याने नेणार, त्या रस्त्यावर वाहतुक अडथळे येवू नये म्हणून अवयव वाहतुकीच्या मार्गावरील सर्व सिग्नल्स ग्रीन अर्थात हिरवे केले जातात.

## नेत्रदान व देहदान करावयाची पूर्तता

**अ) नेत्रदान व देहदान करण्याचा संकल्प केलेल्या व्यक्तीने संबंधीत विषयाची संपुर्ण कल्पना आपल्या स्वजनांना (अपत्ये, पती-पत्नी, नातेवाईक) द्यावे. नातेवाईकांच्या संमतीशिवाय इच्छापूर्ती होऊच शकत नाही.**

**ब) नेत्रदानाचे फॉर्म नेत्रपेढीकडे, देहदानाचे फॉर्म वैद्यकिय महाविद्यालयाकडे आणि देहांगदानाचे फॉर्म सदर संस्थेकडे मिळतील.**

**क) फॉर्म भरुन संस्थेकडे दिल्यास संबंधीत संस्थेकडे सदर संस्थेकडून पोहचविले जाईल.**

### • अधिक माहिती व संपर्क •

**१) अश्विनी ग्रामीण वैद्यकिय महाविद्यालय** संपर्क :- २२८०८९१ ते १७, ९७२३५९३५२७

**२) वैश्यंपायन स्मृती वैद्यकिय महाविद्यालय शरीररचना विभाग** संपर्क :- २७४९४०३/०४

**वैद्यकिय अधिकारी** -९५२७९९३३४९, निवास- ९४२३३२६५६१

**कर्मचारी**- ९३२६९३३९३८/८८८८०५०७६२

**३) जोग नेत्र रुग्णालय- नेत्रदान व नेत्ररोपण केंद्र,**

संपर्क:- ०२१७-२६०२००५,२०१७-२६०११७७ मो. नं. ७७१९९१२६९७

**४) डॉ. नवनीत तोष्णीवाल** - ९४२२०६६०११

**५) श्री. विलासभाई शहा (प्राणीमित्र)** - ९४२३३३३३०५५

**६) डॉ. संदीप होळकर, किडनी विकार व रोपण तज्ञ,** संपर्क:- ९९२३२११११९/९५२१९७४३२८

**७) देहांगदान जीवनदान समाजसेवी संस्था** संपर्क

**चंदुभाई देढीया** - ९८०००२९४०० **नारायण दुमालकर** -९४२३०६८६२८

**अरुण गोरटे** - ९४२२६५१५८८ **डॉ. प्रकाश मठकर** - ९८६०४९६७२५

**श्रीवल्लभ करकमकर** - ९३२६८९७३९० **उदयराज आळंदकर** - ९८२३०२९८२९

**योगीन गुर्जर** - ९८२२०१३००१ **चंद्रकांत कोडगीरवार** - ९४२२४६१५८६

**अनिल पाटील** - ९०९६६२८००९

**"मरावे परी अवयवरुपे उरावे- नि दु:खितांना सुखी करावे"**

**सौजन्य :- श्री. प्रा. अनिल पाटील - सोलापूर**